दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● सोमवार २२ एप्रिल २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक २४९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# आरोप करणा-यांच्या घरी आयाबहिणी नाहीत काय?; अजितदादा भडकले

## राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आज अमरावतीच्या दौ-यावर आहेत.

**वादळवार्ता/अमरावती**

राष्ट्रवादीचे नेते आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला आहे. भाजपा उमेदवार नवनीत राणा यांच्या प्रचारासाठी अजितदादा अमरावतीत आले होते. यावेळी त्यांनी विरोधकांना चांगलंच फटकारलं. आता तुम्ही नवनीत राणा यांना मतदान करा. आम्ही जर तुमचे कामे केले नाही तर आम्हाला विधानसभेमध्ये उभे करू नका. आम्हाला चले जावं म्हणा, असं सांगतानाच विरोधक नवनीत राणा यांच्यावर आरोप करतात. जे आरोप करतात त्यांच्या घरी आईबहिणी नाही का? असा सवाल अजित पवार यांनी केला.अजित पवार आज अमरावतीच्या दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी विरोधकांची चांगलीच फिरकी घेतली. संविधानाच्या मुद्द्यावरून अजितदादांनी विरोधकांचे चांगलेच कान टोचले. बाबासाहेबांनी या देशासाठी उत्तम संविधान दिलं आहे. जोपर्यंत सूर्य आणि चंद्र आहे, तोपर्यंत संविधान कोणी बदलू शकत नाही. विरोधकांकडे विकासाचा मुद्दा नाहीये. सांगायला काही नाही म्हणून घटना बदलणार असल्याचं विरोधक सांगत आहेत, असं अजित पवार म्हणाले.आधी म्हणाले, घड्याळ, नंतर म्हणाले, कमळअजितदादा हे नवनीत राणा यांचा प्रचार करण्यासाठी आले. पण बोलण्याच्या ओघात नवनीत राणा यांना विजयी करा म्हणताना घडाळ्याला मतदान करा असं अजितदादा म्हणाले. त्यानंतर चूक लक्षात येताच कमळाच्या चिन्हावर मतदान करा असं अजितदादा म्हणाले, त्यामुळे सभेत एकच हशा पिकला. काय बिघडले माहीत नाही2014 आणि 2019 मध्ये आम्ही मोदींना विरोध केला. तेव्हा 2014 मध्ये नवनीत राणा यांना आम्ही उमेदवारी दिली. 2019 मध्ये राणा यांना पाठिंबा दिला. आताही आमचा त्यांना पाठिंबा



आहे. त्यामुळे नवनीत राणा विजयी होतील, असं अजितदादा म्हणाले. 2014 मध्ये निकाल यायच्या आधीच आम्ही भाजपला बाहेरुन पाठिंबा दिला. पण आमच्या सहकार्याचे काय बिघडले होते मला माहीत नाही, असं अजितदादा म्हणाले.विरोधकांकडे मुद्दाच नाही, म्हणून...घटनेत दुरुस्ती करावी लागते. नेहरूंपासून ते मोदींपर्यंत सर्वांनी घटना दुरुस्ती केली आहे. लालबहादूर शास्त्री दोन वर्ष पंतप्रधान होते. त्यांनी तीन वेळा घटना दुरुस्ती केली. आतापर्यंत जवळपास 106 वेळा घटना दुरुस्ती झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही घटना दुरुस्ती केली. मागास आयोगाची मुदत संपली होती. ती मुदत वाढवण्यासाठी घटनेत दुरुस्ती करावी लागली. मागास आयोगाची गरज नव्हती का? महिलांना 33 टक्केआरक्षण देण्यासाठी दुसरी घटना दुरुस्ती केली. चांगलं झालं ना? महिला वर्ग 50 टक्के आहे. त्यामुळे त्यांना आरक्षण देण्यासाठी घटना दुरुस्ती करणं गरजेचं होतं. अनेकांची सत्ता होती. आमचं सरकार आल्यावर महिलांना आरक्षण देऊ असं सांगत होते. पण कोणी दिलं नाही.

## ख्यातनाम गायक आनंद शिंदेंचा आज बीड मध्ये बहारदार संगीत रजनी कार्यक्रम..!

**( बीड प्रतिनिधी )**

गतवर्षी प्रमाणे शिव- फुले- आंबेडकर संयुक्तिक महामानवांच्या जयंती महोत्सवा निमित्त ख्यातनाम भीम गीत गायन सम्राट आनंद शिंदे यांचा बहारदार संगीत रजनीचा खास कार्यक्रम आज सोमवार दि. 22 एप्रिल 2024 रोजी सायंकाळी 07.00 वाजता बीड येथील छत्रपती संभाजी महाराज क्रिंडांगण येथे संपन्न होणार आहे. महापुरुषांचे स्मरण व अभिवादन करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित असून, बंधू भगिनींनी बहुसंखेने उपस्थित राहून या शानदार कार्यक्रमाचा लाभ घ्यावा. असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे. विश्ववंदनीय छत्रपती शिवाजी महाराज, विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिराव फुले यांच्या संयुक्तीक जयंती निमित्त महापुरुषांचे वैचारिक जागरण तथा चरित्र दर्शन त्यांच्या कर्तुत्वाची ओळख आजच्या युवा पिढीपर्यंत जावी. महापुरुषांना सन्मानपूर्वक करण्यासाठी बीड करांच्या परिचयांचे ख्यातनाम गायक आनंद शिंदे यांनी संगीत रजनीच्या माध्यामतून आपला अमुल्य वेळ दिला आहे.



कार्यक्रमा साठी भव्य व्यासपीठ, उच्च दर्जाची साउंड व्यवस्था आणि महिला पुरुष ज्येष्ठ नागरिकांना स्वतंत्र बसण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. हजारो श्रोत्यांच्या साक्षीने संगीत रजनीचा कार्यक्रम बहारदारपणे संपन्न होईल. निवडणूक आचार सहितेमुळे हा कार्यक्रम बरोबर सायंकाळी 07.00 वाजता सुरु होईल. याची दखल घेऊन रसिक बांधवांनी वेळेवर उपस्थित रहावे. असे आवाहन राजेंद्र मस्के यांनी केले आहे.



वंचित बहुजन आघाडीचे बीड लोकसभेचे उमेदवार अशोक भाऊ हिंगे विभागीय दैनिक “ दैनिक वादळ वार्ताच्या अंकाचे अवलोकन करताना सोबत दैनिक वादळ वार्ताचे मुख्य संपादक अजय भांगे

## सिद्धार्थनगर येथे शाळा पूर्वतयारी मेळावा उत्साहात



**वादळवार्ता/भोकरदन**

भोकरदन तालुक्यातील सिद्धार्थ नगर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत शाळा पूर्वतयारी मेळावा क्रमांक 1 दिनांक 18 एप्रिल गुरुवार रोजी उत्साहात पार पडला. शाळापूर्व तयारी पहिल्या मेळाव्याच्या सुरुवातीला प्रवेश पात्र मुलांची प्रभातफेरी काढण्यात आली.मेळाव्याचे उद्घाटन भगवान सदाशिवे यांच्या हस्ते करण्यात आले.शाळा पूर्वतयारी मेळाव्यात प्रवेश पात्र सर्व मुलांची नाव नोंदणी करणे, वजन, उंची, शारीरिक विकास, बौद्धिक विकास, सामाजिक आणि भावनात्मक विकास,भाषा विकास, गणन पूर्व तयारी, पालकांना मार्गदर्शन असे विविध उपक्रम मेळाव्यात घेण्यात आले.याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक आर.एच. दानवे, सहशिक्षिका डी.एस. चिटकलवार ,अरुण जावळे, दीक्षा मोरे ,पंचफूला जावळे, निशा जावळे, मयूरी सदाशिवे,रोशनी जावळे इत्यादी उपस्थित होते.

## विद्या मंदिर करंजफेण शाळेत शालेय साहित्यांचे वाटप



**दैनिक वादळ वार्ता**
**कुडूत्री/सुभाष चौगुले**

करंजफेण येथील टेक्सटाईल इंजिनीअर आशिष बाबुराव वागरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने करंजफेण येथील विद्यामंदिर शाळेतील विद्यार्थ्यांना वही - पेन या शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले.या त्यांच्या उपक्रमाचे कौतुक सर्वत्र होत आहे.

समाजामध्ये वाढदिवस साजरे करतांना वारेमाप खर्च करून वाढदिवस साजरे केले जातात.वारेमाप होणार हाच पैसा बचत करून शालेय मुलांना मदतीच्या रुपात खर्च झाला तर विद्यार्थ्यांना मदत होईल.अशा उपक्रमांचा आदर्श आजच्या तरुणांनी डोळ्यासमोर ठेवून शालेय मुलांना मदत केल्यास आपसुकच मनाला आनंद मिळेल

कार्यक्रमात शाळेकडून मुख्याध्यापिका सौ मुंडे मॅडम यांच्या हस्ते आशिष वागरे यांच्या सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी युवा नेते अनुपम वागरे, ऍड बाबासाहेब वागरे, यांचेसह ह. भ. प. विठ्ठल आलंगदार, शिवप्रताप पाटील, अमृत तिटवेकर, बाजीराव वागरे, शैलेश वागरे, उद्धव वागरे आदिसह शिक्षक वर्ग ग्रामस्थ उपस्थित होते.

# चक्क रुग्णालयाच्या अपघात विभागात दोन गटात तुफान हाणामारी..

**अबाजोगाई/परवेज पटेल**

येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाच्या अपघात विभागात रविवारी (दि.२१) दोन गटात तुफान हाणामारी झाली. अचानक सुरू झालेल्या या हाणामारीमुळे रुग्ण, डॉक्टर आणि रुग्णालय कर्मचाऱ्यांत प्रचंड दहशतीचे वातावरण आहे. स्वाराती रुग्णालयाच्या अपघात विभागात बहुतांशी वेळेस अत्यवस्थ रुग्ण असतात. रविवारी देखील अनेक रुग्णांवर या ठिकाणी उपचार सुरू होते. त्याच वेळी ही घटना झाली सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शहरातील मंगळवार पेठेत सुरू असलेल्या आनंद नगरीत रविवारी सायंकाळी सदर बाजार आणि बारभाई गल्लीतील तरुणात वाद झाला. यावेळी एका तरुणाला मारहाण करण्यात आली. त्यानंतर जखमी तरुण स्वाराती रुग्णालयात उपचारासाठी गेला असता त्या ठिकाणी या दोन्ही भागातील तरुणांमध्ये पुन्हा मोठा वाद सुरू झाला. या वादाचे पर्यावसन तुफान हाणामारीत झाले. या तरुणांना अपघात विभाग सारख्या संवेदनशील ठिकाणी गोंधळ घालू नये याचेही भान राहिले नाही. चक्क अपघात विभागात घुसून एकमेकांवर खुर्च्या फेकत त्यांनी प्रचंड गोंधळ घातला. यावेळी रुग्ण, डॉक्टर आणि कर्मचारी जीव मुठीत धरून एका बाजूला जाऊन बसले. किमान पाऊणतास हा धुडगूस सुरू होता. अखेर रुग्णालयाच्या सुरक्षा रक्षकांनी हस्तक्षेप करत जमाव शांत केला. या घटनेमुळे स्वाराती रुग्णालयाच्या सुरक्षा व्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे



संपादकीय

## ऊन लागल्याने हार्ट अटॅक येतो?,


सध्या देशातील अनेक शहरात तापमानामध्ये मोठी वाढ झालीये. अनेक ठिकाणी तर पारा 40 अंशाच्या वर गेलाय. ऊन अधिक लागल्याने बरेच लोक आजारी देखील पडतात. ऊन लागल्याने हार्ट अटॅक येण्याची देखील खूप शक्यता असते. यासाठी आवश्यक ती काळजी घेणे खूप जास्त महत्वाचे ठरते. उन्हाळ्यात हार्ट अटॅक टाळण्यासाठी काही गोष्टी फॉलो करणे अत्यंत आवश्यक ठरते. हार्ट अटॅक उन्हाळ्यात येण्याची अधिक शक्यता असते. उन्हाचा थेट परिणाम हा आपल्या शरीरावर होतो. आता याबद्दल डॉक्टरांनी देखील मोठे भाष्य केले आहे.

वाढलेल्या उन्हामुळे शरीरात पाण्याची कमी होते. यामुळेच हार्ट अटॅक येण्याचे प्रमाण वाढते. हार्ट अटॅक येण्याची नेमकी कोणतीय लक्षणे आहेत, याबद्दल आपण जाणून घेणार आहोत. हार्ट अटॅक येण्याचे सर्वात महत्वाचे लक्षण म्हणजे तुम्हाला थकवा जाणवतो. उन्हाळ्यात थकवा लवकर जाणवतो. थकव्यामुळे थेट हार्ट अटॅक देखील येऊ शकतो.

बऱ्याच वेळा उन्हात फिरल्याने डोकेदुखी होते. या डोकेदुखीमुळे बीपी वाढण्याची दाट शक्यता असते. जर वेळीच याकडे लक्ष दिले नाही तर हार्ट अटॅक येऊ शकतो. उन्हाळ्यात जास्तीत जास्त पाणी पिण्यावर भर द्या. अनेकांना उन्हातून आल्यावर चक्कर येते, अशावेळी देखील हार्ट अटॅक येण्याची शक्यता अधिक असते, यामुळे अशावेळी डॉक्टरांशी संपर्क साधावा.

दिल्लीच्या राजीव गांधी हॉस्पिटलचे कार्डियोलॉजी विभागाचे डॉ. अजित जैन यांनी याबद्दल अत्यंत मोठी आणि महत्वाची माहिती दिलीये. डॉ. अजित जैन म्हणाले की, उष्माघातामुळे हार्ट अटॅक येण्याची शक्यता अधिक असते. वाढत्या उन्हामुळे आपले शरीर हे तापमान राखण्याचा प्रयत्न करत असते, यामुळे हार्ट बीट अधिक वाढतात.

यावेळी हृदयावर दबाव येतो. हार्ट बीट अचानक वाढल्याने हार्ट अटॅक येण्याचा धोका असतो. उन्हात अधिक काळ बाहेर राहिल्याने हार्ट अटॅक अधिक येतो. वयस्कर लोक आणि गर्भवती महिलांनी शक्यतो उन्हात जास्त बाहेर पडून नये. दिवसाला सात ग्लॉस पाणी प्यावे. लिंबू पाण्याचा देखील समावेश करावा. शक्यतो उन्हात बाहेर पडताना पूर्ण काळजी घ्यावी.



# पूज्य बुद्धी चालवा आणि पृथ्वीला वाचवा!

(विश्व/ आंतरराष्ट्रीय/ जागतिक वसुंधरा दिन/ पृथ्वी दिवस सप्ताह विशेष)

मानवाला सुखाने जगायचे व आपले अस्तित्व टिकवायचे असेल तर पृथ्वीचा समतोल राखता आला व पृथ्वीला तिच्या महाविनाशापासून वाचविता आले पाहिजे. तिचा समतोल राखण्यासाठी मानवाने वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आणि वृक्षतोड कमी करणे, प्राणी व पक्षी यांचे कमी होणारे प्रमाण वाढवणे, नद्यांचे जल स्वछ ठेवणे, आपल्या सभोवतालच्या पर्यावरणात स्वच्छता राखणे, शेतीत जैविक खतांचा वापर करणे, रासायनिक खते कमी वापरणे यांकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. अशी ज्ञानवर्धक माहिती वाचा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी यांच्या शब्दांतून... संपादक.

वसुंधरा किंवा पृथ्वी दिन हा पृथ्वीच्या पर्यावरण संवर्धन जागृती करण्यासाठी जगभर पाळण्यात येतो. आपली पृथ्वी ही सुमारे ४.५० अब्ज वर्षांपूर्वी तयार झाली. अमेरिकेत २२ एप्रिल रोजी हा दिन पाळला जातो, तर संयुक्त राष्ट्रे २० मार्च रोजी, म्हणजे सूर्य पृथ्वीच्या विषुववृत्ताच्या थेट समोर असण्याच्या दोन बिंदूपैकी एका बिंदूशी पोचण्याच्या दिवशी- संपातबिंदू होतो, तोच पृथ्वी दिन पाळतात. महाभारतामध्ये भारताच्या वर्णनाप्रमाणेच जगातील अन्य भौगोलिक स्थळांचे वर्णन आढळते. उदा. मंगोलियाचे गोबी वाळवंट, इजिप्तची नाईल नदी, लाल समुद्र इत्यादी इत्यादी. तसेच महाभारतातल्या भीष्म पर्वातील जम्बुखंड- विनिर्माण पर्वात संपूर्ण पृथ्वीचे मानचित्र सांगितले आहे. ते असे-

"सुदर्शनंप्रवक्ष्यामिद्वीपंतुकुरुनन्दन|
परिमण्डलो महाराज द्वीपोसौ चक्रसंस्थित:||
यथाहि पुरुष: पश्येदादर्शे मुखमात्मन:|
एवंसुदर्शनद्वीपोदृश्यतेचन्द्रमण्डले||
द्विरंशे पिप्पलस्तत्र द्विरंशेच शशो महान्||

याचा अर्थ- हे कुरुनन्दन! सुदर्शन नावाचे हे द्वीप चक्राप्रमाणे गोलाकार स्थित आहे. ज्याप्रमाणे पुरुष आरशात आपला चेहरा बघतो, त्याचप्रमाणे हे द्वीप चंद्रावरती दिसते. याच्यातील दोन अंशांमध्ये पिंपळाची पाने आणि दोन अंशांमध्ये मोठा ससा दिसतो.

पृथ्वी दिनासाठी जॉन मक्डॉनेल याने बनवलेला अनधिकृत ध्वज पर्यावरण रक्षणाची शिकवण देण्याच्या हेतूने फडकविला जातो. अमेरिकेचा सिनेटर गेलॉर्ड नेल्सन याने २२ एप्रिल १९७० रोजी पहिल्यांदा पृथ्वी दिनाचे आयोजन केले. पहिला पृथ्वी दिन अमेरिकेतील सॅनफ्रान्सिस्को येथे पाळला गेला. तरीही त्या कार्यक्रमाचे राष्ट्रीय समन्वयक असलेले डेनिस हेस यांनी स्थापलेल्या संस्थेने इ.स. १९९० साली १४१ देशांमध्ये या दिवसाचे आयोजन केले व पृथ्वी दिन आंतरराष्ट्रीय स्तरावर नेला. सद्या अर्थ डे नेटवर्क या संस्थेच्या समन्वयाने १७५ देशांमधून हा दिवस साजरा केला जातो. इ.स. २००९ साली संयुक्त राष्ट्रांनी २२ एप्रिल हा दिवस आंतरराष्ट्रीय धरणीमाता दिन म्हणून पाळण्याची घोषणा केली. पृथ्वी हा सूर्यमालेतील सूर्यापासूनच्या अंतरानुक्रमे तिसरा तर आकारानुक्रमे पाचवा ग्रह आहे. सूर्यमालेतील खडकाळ ग्रहांमध्ये हा सर्वांत मोठा आहे. पृथ्वीला निळाग्रह असेही म्हणतात. जिथे जीवन आहे, अशी पूर्ण विश्वात ही एकमेव ज्ञात जागा आहे. पृथ्वीची निर्मिती साधारणपणे ४५७ कोटी वर्षांपूर्वी झालीअसावी. तिचा उपग्रह चंद्र साधारणपणे ४५३ कोटी वर्षांपूर्वीपासून तिला प्रदक्षिणा घालू लागला. हिचा व्यास १२,७५६ किमी एवढा आहे. सूर्यापासून तिचे अंतर साधारणपणे १४,९५,९७,८९० किमी एवढे आहे.

पृथ्वीला स्वत:भोवती एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यास २४ तास लागतात. तसेच सूर्याभोवती प्रदक्षिणा पूर्ण करण्यास ३६५ दिवस लागतात. या ३६५ दिवसांच्या कालावधीला आपण एक वर्ष म्हणतो. पृथ्वी तिच्या स्वत:भोवती फिरण्याच्या आसापासून २३.५ अंशांनी कललेली आहे. याच स्थितीत ती स्वत:भोवती व सूर्याभोवती प्रदक्षिणा पूर्ण करते, म्हणूनच पृथ्वीवर उन्हाळा, पावसाळा आणि हिवाळा असे ऋतुचक्र सुरू असते. मानवाला सुखाने जगायचे असेल तर पृथ्वीचा समतोल राखता आला पाहिजे. तिचा समतोल राखण्यासाठी मानवाने वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन आणि वृक्षतोड कमी करणे, प्राणी व पक्षी यांचे कमी होणारे प्रमाण वाढवणे, नद्यांचे जल स्वछ ठेवणे, आपल्या सभोवतालच्या पर्यावरणात स्वच्छता राखणे, शेतीत जैविक खतांचा वापर करणे, रासायनिक खते कमी वापरणे यांकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे.

पृथ्वीवर सूर्याचा प्रकाश पोहचण्यासाठी साधारणत: ८ मिनिटे २० सेकंद लागतात. पृथ्वी सूर्याभोवती लंबवर्तुळाकार मार्गाने प्रदक्षिणा पूर्ण करते. या प्रदक्षिणेमध्ये थोडाजरी फरक पडला असता, तर पृथ्वीवर कदाचित जीवसृष्टी निर्माण झाली नसती. पृथ्वीची रचना, गुरुत्वाकर्षण, सूर्यापासूनचे ठराविक अंतर आणि पृथ्वीवर असलेले वातावरण यामुळेच तिच्यावर जीवसृष्टी निर्माण झाली असावी, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. पृथ्वीशिवाय इतर कोणत्याही ग्रहावर जीवसृष्टी नाही. पृथ्वी स्वत: चुंबक असल्याने पृथ्वीभोवती चुंबकिय क्षेत्र आहे, या चुंबकीय क्षेत्रमुळे सूर्यापासून येणारे हानीकारक किरण पृथ्वीच्या धृवीय क्षेत्राकडे वळतात.

पृथ्वीच्या उत्पत्तीनंतर भौगोलिक आणि जैविक प्रक्रियांनी तिच्यात खूप परिवर्तन झाले आहे. पृथ्वी आपल्या अक्षाभोवती पश्चिमेकडून पूर्वेकडे फिरते. ती तळाच्या उंचीचा हिस्टोग्राम तिच्या तळावर पाण्याची विपुलता एक अद्भूत वैशिष्ट्य आहे, जे सौर मंडळाच्या अन्य ग्रहांपासून या निळ्या ग्रहाला वेगळे करते. पृथ्वीच्या जलमंडळात मुख्यत: महासागर आहे, परंतु तांत्रिक रूपाने दुनियेत उपस्थित इतर पाण्याचे स्त्रोत जसे- अंतर्देशीय समुद्र, तलाव, नदी आणि दोन हजार मीटर खोल भूमिगत पाण्यासहित यात सामावले आहे. पाण्यातील सर्वात खोल जागा १०,९११.४ मीटर खोल प्रशांत महासागरमध्ये मारियाना ट्रेंचची चैलेंजर डीप आहे. कॅनडा मधील रॉकी पर्वत मोराइन लेकला दुर्लक्षित करतो. जीवन टिकवून ठेवणारा एक ग्रह म्हणजे जगणे अस्तित्वात नसले, तरीसुद्धा राहण्यायोग्य असे म्हटले जाते. पृथ्वी द्रव पाणी पुरवते- एक वातावरण जेथे जटिल सेंद्रिय अणू एकत्र येऊन संवाद साधू शकतात आणि चयापचय प्रक्रिया टिकवून ठेवण्यासाठी पुरेशी ऊर्जा देऊ शकतात. माणूस चंद्रावर जाऊन तेथे वास्तव्य करण्याची भाषा- वल्गना करत आहे, मात्र त्याला या साध्या पृथ्वीवर धड चालता येत नाही. त्याच्या अशा बेजबाबदार चालण्या- वागण्यामुळे जीवसृष्टीचे अस्तित्व धोक्यात आले, तर पृथ्वीचा महाविनाश अटळ आहे. म्हणून मानवजातीचा तळपट थांबविण्यासाठी मानवाने सावध वागलेच पाहिजे, हीच त्याची पूज्य बुद्धी ठरेल! !! वसुंधरा दिनाच्या समस्त बुद्धिजीवी प्राण्यांना सप्ताहभर हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

**- संकलन वसुलेखन -**
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**मु. पो. ता. जि. गडचिरोली.**
**भ्रमणध्वनी- ७७७५०४१०८६.**

# उन्हाळ्यात केस गळतीची समस्या कशी टाळावी? काय घ्यावी काळजी जाणून घ्या सविस्तर

उन्हाळा आता सुरू झाला असून त्याच्या झळा सर्वांना बसत आहेत. तापमानामध्ये दिवसेंदिवस वाढ होतेय. उन्हाळ्यातील गरमीने प्रत्येकजण त्रस्त असतो. उन्हाळ्यात अनेक शारीरिक आजार डोकेवर काढतात. बाहेर पडलात की ऊन तर लागतंच पण त्यासोबतच डिहायड्रेशन, पोटदुखी, मळमळ होणं, चक्कर येणं, त्वचेचे विकार हे आजार होतात. आता उन्हाळ्यामध्ये अनेकांना केसांची समस्या ही उद्भवू शकते. यामध्ये तेलकट टाळू, घाम आणि धूळ यामुळे कोंडा, खाज सुटणे आणि केस गळती याचा समावेश असतो. याची नेमकी कारणे काय? आणि कशा प्रकारची खबरदारी घ्यायला हवी, जाणून घ्या.आजच्या जीवनशैलीत केस गळणे ही एक सामान्य समस्या बनली आहे. ज्यामुळे पुरूषांपासून महिलांपर्यंत स्त्रिया अस्वस्थ होतात. पण जेव्हा केसांची झपाट्याने गळती होऊ लागते तेव्हा चिंता वाढू लागते. विशेषत: केसगळती ही बऱ्याचदा अनुवंशिक, अनियमित खाणे, जास्त तणाव आणि मद्यपानाचे अतिरिक्त सेवन यामुळे होते. यासाठी केसांची योग्य काळजी राखणं गरजेचं आहे. उन्हाळ्यामध्ये केसांची गळती मोठ्या प्रमाणात का होते? आपण नेमकी काय चूक करतो? कुठे काळजी घेत नाही? याबाबत त्वचारोग तज्ज्ञ, डॉ. शरीफा चाऊस यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

उन्हाळ्यात केस गळतीची कारणे

उन्हाळ्याच्या दिवसात केसगळती वाढण्यास अनेक घटक कारणीभूत असतात. त्यापैकी एक प्रमुख घटक म्हणजे कडक ऊन. सूर्यप्रकाशातील अतिनील किरणांमुळे केसांची मुळ कमकुवत होऊ शकतात तर केस तुटू शकतात. उच्च तापमान आणि आर्द्रतेमुळे जास्त घाम येऊ शकतो, ज्यामुळे डोक्यात कोंडा होणे आणि फोड येण्यासारख्या समस्या उद्भवतात, परिणामी केस गळती वाढते. उन्हाळ्यात क्लोरीनयुक्त पाण्यात पोहल्याने किंवा खारट पाण्यात पोहल्याने केसांची मुळ कमकुवत होते तसेच त्यांचे नुकसान होते आणि त्यामुळे ते तुटण्याची अधिक शक्यता असते. उष्ण हवामानात ब्लो ड्रायर्स आणि स्ट्रेटनर्स सारख्या साधनांचा वापर केल्याने केस गळणे आणखी वाढू शकते.कोणत्याही गोष्टीचा अतिरेक शरीरासाठी हानिकारक ठरतो. कोरडे आणि कमकुवत केस, टाळुला खाज सुटणे आणि टाळू कोरडा पडणे, घामाचा साचल्यामुळे डोक्यातील कोंडा होतो आणि बॅक्टेरियामुळे देखील केसांच्या मुळांना संसर्ग होतो (फॉलिक्युलायटिस) आणि केस गळतात. या व्यतिरिक्त पुरेसे पाणी न प्यायल्याने केस गळतीची समस्या उद्भवू शकते. उन्हाळ्यात हायड्रेशन काळजी न घेतल्याने केस कमकुवत होऊन गळू लागतात. याशिवाय उन्हाळ्यात घाम येत असल्याने बऱ्याचदा डोक्यावरून अंघोळ केली जाते. यामुळेही केस गळती होते. आठवड्यातून 2 किंवा 3 वेळा केस धुवावेत. याशिवाय केस घट्ट बांधून ठेवल्याने घाम येऊन त्यात बॅक्टेरिया तयार होतात. यामुळेही केस गळू शकतात.

तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार, केस गळतीची ही समस्या आता महिलांसह पुरूषांमध्येही दिसून येत आहे. अनेक पुरूषांचं कमी वयात टक्कल पडतं. सध्याचं धकाधकीचं आयुष्य हे यामागील एक कारण असू शकते. केस गळतीमुळे तणाव वाढणे आणि आत्मविश्वास कमी होतो. एका अहवालानुसार भारतातील सुमारे 20 ते 30 टक्के महिला पातळ केसांमुळे त्रस्त आहेत.

# डॉ.ज्योतीताई मेटे यांनी लोकसभा निवडणुकीतून माघार घेतल्याबद्दल आभारी आहे - अशोक हिंगे

## संत, महंत ,वेद पंडित याची उपस्थिती

वादळवार्ता/बीड

शिवसंग्राम चे नेत्या डॉ ज्योतीताई मेटे यांनी लोकसभा निवडणूक न लढवण्याचा घेतलेला निर्णय अभिनंदनिय व स्तुत्य आहे त्यांचे मी आभार व्यक्त करतो असे मत वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी व्यक्त केले पुढे बोलताना हिंगे म्हणाले की जनतेमधून ज्योतीताई मेटे यांना उमेदवारी मिळावी अशी इच्छा होती त्यामुळे त्यांनी प्रशासकीय पदाचा त्याग केला शरद पवारांची भेट घेतली दोन वेळा चर्चा झाल्या मात्र पवारांनी ज्योतीताईंना उमेदवारी दिली नाही ज्योतीताईंना उमेदवारी मिळाली असती तर प्रशासकीय कामाचा दांडगा अनुभव असलेल्या ज्योतीताई चा जिल्ह्याच्या विकासात मोठा हातभार लागला असता स्वर्गीय विनायकरावजी मेटे साहेब यांच्यासोबत मला अनेक वर्ष काम करण्याची संधी मिळाली आमचे कौटुंबिक संबंध आहेत त्यामुळे ज्योतीताईंना उमेदवारी मिळाली असती तर वंचित बहुजन आघाडीचा त्यांना जाहीर पाठिंबा राहिला असता मात्र तसे घडले नाही आणि ज्योतीताई मेटे यांनी निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला यामुळे उच्च विभू षित, उच्चपदस्थ, हुशार नेतृत्वापासून जिल्ह्याला लांब ठेवल्याची खंत वाटत आहे ज्योतीताई उमेदवार असत्या तर अशोक हिंगे पाटील उमेदवार दिसले नसते अशी ही अशोक हिंगे यांनी सांगितले मेटे ताई आणि मी एकाच कुटुंबातील आहोत दोघांच्या उमेदवारीमुळे मत विभाजना झाले असते मात्र ज्योतीताईने घेतलेल्या निर्णयामुळे आता मतवीभाजन टाळणार असून याचा फायदा वंचित आघाडीला होईल असे सांगितले ज्योतीताईने उदार मनाने, मोठेपणाने लोकसभेतून माघार घेतली त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत त्यांच्या या ऋणातून उत्तरदायी होण्यासाठी मी सतत प्रयत्नशील राहील असेही अशोक हिंगे यांनी सांगितले.



## देवगांव येथील रेणूका देवीची यात्रा मंगळवार पासुन सुरु

### बीड लोसभेची निवडणूक आता सुरु असल्याने यात्रेत कुस्त्यावरुन वाद तंटा होऊ नये म्हणून यावर्षी रेणुका देवी यात्रेत कुस्त्यांचा फड होणार नाही-रमाकांत (बापू) मुंडे

वादळवार्ता/केज तालुक्यातील देवगांव येथील रेणुका देवीची यात्रा दरवर्षी प्रमाणे यावर्षीही मंगळवार दि.२३ एप्रिल रोजी सकाळी देवीचा गाढा व पालखी मिरवणुक सोबतच निघेल व बुधवारी संध्याकाळी (छबिना) पालखी गावात मिरवूण देवीच्या यात्रेची सांगता होणार आहे. तरी या यात्रा महोत्सवात मोठ्या संख्येंने सहभागी होऊन यात्रेची शोभा वाढवावी अशी विनंती रेणुका देवी संस्थानचे अध्यक्ष रमाकांत (बापू) मुंडे व यात्रा कमेटीच्या सदस्यांसह गावक-यांनी केली आहे.

केज तालुक्यातील देवगांव येथे गावच्या उत्तर दिशेला दोन कि.मी.अंतरावर तिर्थक्षेत्र रेणुका माता देवीचे सुंदर मंदिर आहे. गावक-यांचे व पंचक्रोशितील गावांचे ग्रामदैवत असलेल्या या रेणुका देवीची यात्रा दरवर्षी चैत्र महीन्यातील पौर्णीमेच्या दिवशी भरली जाते दर वर्षीप्रमाणे या वर्षीही २३ एप्रिल मंगळवार रोजी सकाळी हानुमान जयंती उत्सव साजरा करुन सकाळी नऊ वाजता रेणुका देवीचा गाढा व देवीची पालखी देवगांव येथून वाजत गाजत मंदीराकडे मार्गस्थ होईल. हा पालखी सोहळा पाहण्यासाठी पंचक्रोशील मंडळी व महीला व बालकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे तर दुस-या दिवशी बुधवारी दुपारी चार वाजता रेणुका देवी मंदिर परिसरात महाप्रसादाची मोठी पंगत होणार असुन त्याच दिवशी संध्याकाळी गावात देवीचा (छबिना) पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे.तरी या यात्रा महोत्सवात मोठ्या संख्येंने सहभागी होऊन यात्रेची शोभा वाढवावी अशी विनंती रेणुका देवी संस्थानचे अध्यक्ष रमाकांत (बापू) मुंडे व यात्रा कमेटीच्या सदस्यांसह गावक-यांनी केली आहे.

## अंबाजोगाईत पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ अक्षय मुंदडा यांची प्रचारफेरी

दैनिक वादळ वार्ता अंबाजोगाई/ परवेज पटेल बीड लोकसभा मतदारसंघाच्या महायुतीच्या अधिकृत उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रचारासाठी शनिवारी श्री राम मंदिरात दर्शन घेऊन प्रचाराची सुरुवात केली. यावेळी प्रचार फेरीत युवा नेते अक्षय मुंदडा यांनी अंबाजोगाई शहर भागातील प्रभाग क्रमांक २ व ३ राममंदिर,भट्ट गल्ली,जैन गल्ली,गौंड गल्ली, कोठाड गल्ली, खतीब गल्ली, कोष्टी गल्ली, झारे गल्ली, कैकाड गल्ली,धनगर गल्ली,पटाईत गल्ली या परिसरात डोर टू डोर प्रचार व प्रत्येक घरोघरी मतदारांशी संवाद साधत सर्वांनी लोकनेत्या पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना बहुमत देऊन ताईंच्या पाठीशी खंबीर पणे उभे राहावे असे आवाहन केले. यावेळी अक्षय मुंदडा यांच्या समवेत शहरातील असंख्य कार्यकर्ते, महायुतीचे पदाधिकारी व ईतर मान्यवर उपस्थित होते.

## स्पर्धेचे युवा टिकण्यासाठी आतापासून स्पर्धा परीक्षा देणे आवश्यकममधुकर सानप

वादळवार्ता/शिरूर कासार सध्याचे युग स्पर्धेचे युग आहे या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी आतापासून शालेय स्तरावर नवोदय स्कॉलरशिप व मंथन सारख्या स्पर्धा परीक्षा देणे आवश्यक असल्याचे मत राज्यस्तरीय मंथन परिषदेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांच्या सत्कार प्रसंगी माजी चेअरमन तथा लोकनेते गोपीनाथ मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्थेचे विद्यमान संचालक मधुकर सानप यांनी व्यक्त केले.



या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हिवरसिंगा केंद्राचे केंद्रप्रमुख तथा मुख्याध्यापक भागवत राख तर प्रमुख पाहुणे म्हणून लोकनेते गोपीनाथ मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्थेचे सचिव विष्णू मिसाळ, शिरापूर शाळेचे मुख्याध्यापक सोनवणे ,शिक्षक वारे शिक्षण प्रेमी नागरिक सिद्धेश्वर दुधाळ, भागवत देवकर ज्ञानेश्वर दुधाळ आदीजण उपस्थित होते. शासनमान्य वेल्फेअर असोसिएशन आयोजित राज्यस्तरीय मंथन स्पर्धा परीक्षेत हिवरसिंगा शाळेतील विद्यार्थी समीक्षा देवकर श्रावणी दुधाळ,श्रेयश देवकर,रुद्रा दुधाळ आणि विद्यार्थी यांनी केंद्रस्तरीय परीक्षेतमध्ये भरघोस यश मिळवले आहे.या सर्वांचे उपस्थित मान्यवरांच्या उपस्थितीत बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला.याप्रसंगी पुढे बोलताना ते म्हणाले की स्पर्धेचेच्या युगात टिकण्यासाठी हिवरसिंगा शाळेतील शिक्षक सदैव तत्पर राहून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी नेहमी वेगवेगळे उपक्रम राबवत असतात. या प्रसंगी हिवरसिंगा केंद्रातील सर्व शिक्षक बंधू व भगिनी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक सूत्रसंचालन विष्णू मिसाळ यांनी केले तर आभार दत्ता दुधाळ यांनी मानले.यावेळी विद्यार्थी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हजारो भाविकांच्या उपस्थितीत घोगसपारगाव मधे नारळी सप्ताह प्रारंभ

### भगवान बाबा कि जय ! या जयघोषाने आसमंत दुमदुमून गेले!

वादळवार्ता/शिरूर कासार

शिरूर कासार तालुक्यातील घोगसपारगा येथे रविवारी चार वाजता पुष्पवृष्टी होऊन हजारो भाविकांच्या उपस्थितीत श्रीक्षेत्र भगवान गडाचा ९० वा नारळी सप्ताह प्रारंभ झाला . गडाचे महंत डॉ न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांचे अध्रक्षतेखाली रविवारी त्यांचे हस्ते व संत महंताच्या उपस्थितीत विणा ,टाळ मृदंग गाथा ज्ञानेश्वरी पुजन करून विणा उभा केला गेला ,ज्ञानेश्वरी पारायण व गाथा भजन सिध्देश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री व भगवानगडाचे प्रधान आचार्य नारायण स्वामी यांनी सुरूवात केली .यावेळी अतुल शास्त्री ,भगवान शास्त्री ,हनुमान शास्त्री ,काशिनाथ शास्त्री ,आदीसह सर्व गडाचा साधक वर्ग उपस्थित होता .



डॉ न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांची ग्रामस्थाकडून भव्य मिरवणूक काढली होती त्यांचे आगमन होताच भगवान बाबा की जय या जयघोषाने आसमंत दुमदुमून गेला होता.बच्चा भी बोला जय भगवान और बुढा भी बोला जय भगवान ! प्रतेकाचे तोंडी भगवान बाबा हेच ऐकु येत होते .विणा पुजनानंतर पहिली पंगत मोतीचूर लाडू कुरडया पापड व त्याचबरोबर भाकरी आणि खमंग आमटीचा आस्वाद घेतला गेला . ज्ञानेश्वरी भावकथेला प्रारंभ ! पारंपारीक नियमाप्रमाणे पुजाविधी झाल्यानंतर महंत डॉ न्यायाचार्य नामदेव महाराज शास्त्री यांचे रसाळ ओघवत्या वाणीतून ज्ञानेश्वरी भावकथेचे निरूपण झाले .सात दिवस भावकथा ऐकण्याचे भाग्य लाभणार आहे .पारगांवकर भगवानभक्तांच्या सेवेसाठी परिश्रमाची पराकाष्टा करत आहेत .

# मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे आवाहन

वादळवार्ता/बीड

मतदान करणे हा आपला हक्क आहे. 39 बीड लोकसभा मतदारसंघात सोमवार दिनांक 13 मे रोजी मतदान आहे. या दिवशी मतदानाचा हक्क बजावून आपल्या मतदारसंघातील मतदानाचा टक्का वाढवावा, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी केले.

आज रविवारी जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात 39 बीड मतदारसंघातील मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी विविध विभागांची बैठक आयोजित केली, यावेळी त्या संबोधित करीत होत्या. याबैठकीस जिल्हा परिषदेच्या प्रकल्प संचालक संगीता देवी पाटील, उपजिल्हा निवडणूक अधिकारी महेंद्रकुमार कांबळे, स्वीपचे नोडल अधिकारी डॉ. विक्रम सारूक उपस्थित होते. जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी आपापल्या स्तरावरून प्रत्येकांनी चौथ्या टप्प्यात 13 मे रोजी बीड लोकसभा मतदार संघात होणाऱ्या मतदानाच्या दिवशी मतदानाचा टक्का वाढविण्याचे आवाहन करुन, स्वतः मतदान करणे आणि इतरांना मतदान करण्यासाठी जागरूक करणे हे आपले नैतिक कर्तव्य असून ते पार पाडावे असे, त्या यावेळी म्हणाल्या. यासह आपण सर्व शासनाचा भाग आहोत. निवडणुकीच्या एकूण प्रक्रियेमध्ये विविध जबाबदारी आपण पार पाडत आहोत. त्यामुळे मतदानाचा प्रचार प्रसार करणे हे आपले आद्य कर्तव्य असल्याचेही त्यांनी यावेळी आग्रहपूर्वक सांगितले. मतदानाचा टक्का वाढविण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याचे निर्देश यावेळी त्यांनी दिले.

याप्रसंगी पोस्ट ऑफिस, राष्ट्रीय तसेच मान्यताप्राप्त बँक, राज्य परिवहन महामंडळ, आरटीओ, एलआयसी यांनी त्यांच्या कार्यालयात बॅनर, सेल्फी पॉईंट, स्टॅम्प च्या माध्यमातून 39 बीड मतदारसंघात 13 मे रोजी होणाऱ्या निवडणुकी विषयक ग्राहकांमध्ये करीत असलेल्या प्रचार प्रसारबद्दलची माहिती संबधित कर्मचाऱ्यांनी दिली.

जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांमध्ये मतदान जागृती मोहीम राबवित आहेत. याअंतर्गत रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, मतदारांना जागृत करण्याची शपथ, मतदान करण्याचे आग्रहाचे निमंत्रण, प्रभात फेरी, आई-वडिलांना पोस्टकार्डने पत्र लिहून मतदानासाठी प्रवृत्त करने. असे नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू असल्याची माहिती गट शिक्षणाधिकारी गजानन सोनवणे यांनी दिली.

यासह शासनाच्यावतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने 'सेल्फी विथ सिग्नेचर' ही यशस्वी मोहीम राबवली गेली. आकाशवाणीवर जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, पोलीस अधीक्षक, स्वीप नोडल अधिकारी यांच्या मुलाखती येत्या काळात प्रसारित होणार आहेत, माहिती कार्यालयाच्यावतीने फेसबुक, एक्सच्या माध्यमातून मतदान जागृती केली जात असल्याची, माहिती अधिकारी अंजू निमसरकर यांनी सांगितले.



यासह येत्या काही दिवसात जिल्ह्यात मतदानाचा प्रचार प्रसार करण्यासाठी 'मेगा इव्हेंट्स' आयोजित केले या अंतर्गत सायक्लोथॉन, मानवी साखळी असे उपक्रम राबवण्यात येतील असल्याचे स्वीपचे नोडल अधिकारी डॉ.सारूक यांनी सांगितले. मतदार स्तनदामाता तसेच गरोदर महिलांसाठी असणार विशेष व्यवस्था मतदानाच्या दिवशी बीड जिल्हयात स्तनदा माता तसेच गरोदर महिलांसाठी विशेष व्यवस्था केली जाईल. या अंतर्गत मतदानाच्या ठिकाणी तात्पुरती अंगणवाडया तयार करून लहान बालकांना खेळणी तसेच मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिले जातील. या ठिकाणी स्तनदा माता तसेच गरोदर महिला त्यांचा मतदानाचा क्रमांक येईपर्यंत येथे थांबू शकतील, अशी माहिती प्रकल्प संचालक श्रीमती पाटील यांनी दिली. मतदार नागरिकांनी समाज माध्यमांद्वारे 13 मे चा प्रचार करावा मतदान करणे हा नागरिकांचा हक्क आहे यासाठी मतदारांनी मतदारांमध्ये प्रचार प्रसार करण्यासाठी विविध समाज माध्यमांचा वापर करावा. यामध्ये मोबाईलवर डी.पी., स्टेटस, रिल्स, फेसबुक, शॉर्ट, इंस्टाग्राम या आणि अन्य समाज माध्यमांचा उपयोग करून सोमवार दिनांक 13 मे 2024 रोजी मतदानाच्या हक्क बजावण्याचा प्रचार प्रसार करावा असे, आवाहन, जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी आज केले.

# वारणीचा डॉ. श्रीकांत केदार झाला एमबीबीएस!




**वादळवार्ता/शिरूर कासार**
तालुक्यातील वारणी येथील रहिवासी डॉ. श्रीकांत प्रभाकर केदार याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव येथून इंटरशिप पूर्ण करून एमबीबीएसची पदवी घेतली असल्याने संपूर्ण गावात त्याचे स्वागत व सत्कार होत आहे. डॉ.श्रीकांत चे वडील प्रभाकर शंकरराव केदार हे आदर्श शिक्षक ह्मणून कार्यरत आहेत.आई एक उत्तम ग्रहणी आहेत. मात्र डॉ. श्रीकांत याने आई वडिलाचे संस्कार,गरिबीची जान,मेहनतीच्या आणि बौद्धिक क्षमतेच्या जीवावर एमबीबीएसचे शिक्षण पूर्ण करून पदवी हासील केली . डॉ. श्रीकांत केदार अगदी बालपणापासून अत्यंत हुशार , मेहनती आणि धाडसी विद्यार्थी होता. डॉक्टर श्रीकांत याचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वारणी येथे झाले असून माध्यमिक शिक्षण प्रगती विद्यालय ,बीड येथे तर उच्च माध्यमिक शिक्षण लातूर येथे पूर्ण केल्यानंतर वैद्यकीय शिक्षण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात जळगाव येथे पूर्ण केले आहे. डॉ. श्रीकांत लहानपणापासूनच अतिशय हुशार आणि कुशाग्र बुद्धिमत्तेचा असल्याने त्याला ग्रामीण भागातील जाण असल्याने यापुढे पदव्युत्तर शिक्षण (M.D./M.S.)घेऊन

ग्रामीण भागातील गरीब, वंचित ,दलीत,आदिवासी रुग्णांची सेवा करण्याचा मानस असल्याचे श्रीकांतने सांगितले. जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पदवीधर समारंभ नुकताच १६ एप्रिल २०२४ रोजी संपन्न झाला असून महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल मा. रमेश बैस. सर आरोग्य विद्यापीठ नाशिक येथील उप कुलगुरू डॉ.माधुरी कानीटकर मॅडम. तसेच जळगावचे जिल्हाधिकारी मा.आयुष प्रसाद, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय जळगाव येथील अधिष्ठाता.डॉ.गिरीश ठाकूर सर .व महाविद्यालयाचे शिक्षक वृंद यांच्या उपस्थितीमध्ये डॉ. श्रीकांत केदार यास पदवी प्रदान करण्यात आली. डॉ. श्रीकांत केदार यांना पदवी मिळाल्यामुळे वारणी गावचे प्रथम नागरिक सरपंच ज्ञानदेव अण्णा केदार, उपसरपंच केशव केदार, केशवराज संस्थांनचे मठाधिपती बाबा साहेब महाराज बडे , भास्करराव नागरगोजे, सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ, पंचायत समितीचे माजी सभापती बाबुराव केदार, अनिल केदार,डॉ.पद्माकर घुले.आई विजया प्रभाकर केदार, बहिण प्रणिता धनंजय वाघ, मामा ब्रम्हानंद बिनवडे, मनीषा भागवत केदार, अर्चना किरण केदार, पूजा किशोर केदार, पार्वतीबाई शंकरराव केदार, शोभा महादेव केदार, उषा भीव सेन नागरगोजे, उषा भाऊसाहेब नागरगोजे, कविता शिवाजीराव शिरसाट, सोनाली प्रदीप कुटे, सीमा आनंतराव केदार यांच्यासह नातेवाईक, मित्रपरिवार व नागरिकांनी डॉ. श्रीकांत केदार यांचे कौतुक केले .

# पद्मश्री डॉ. जी.डी. यादव यांची रत्नप्रकाश आयुर्वेदला भेट.


दैनिक वादळ वार्ता
कुडूत्री/सुभाष चौगुले
राधानगरी तालुक्यातील, चांदेकरवाडी येथील तरुण शेतकरी श्री. कुलदीप खोत यांनी स्थापन केलेल्या रत्नप्रकाश वनौषधी लागवड व प्रक्रिया उद्योगास, पद्मश्री डॉ. जी. डी. यादव यांनी सदिच्छा भेट दिली. डॉक्टर जी. डी. यादव यांनी आजपर्यंत घडवलेल्या १११ पीएचडी, १४७ मास्टर्स, आणि ४८ पोस्ट डॉक्टरेट संशोधकांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याचे प्रतिबिंब म्हणून, त्यांना एशियन सायंटिस्ट मॅक्झिन ने आशियातील सर्वोच्च १००




शास्त्रज्ञांच्या यादीमध्ये जेष्ठ शास्त्रज्ञ डॉक्टर जी. डी. यादव यांचा नुकताच समावेश झाला आहे. देश-विदेशातील १५१ पुरस्काराने ते सन्मानित आहेत, याचबरोबर त्यांच्या नावे १२३ पेटंट आहेत. तसेच उद्योगपती मुकेश अंबानी हे त्यांचे विद्यार्थी होत. औषधी वनस्पती मध्ये प्रत्यक्ष लागवड आणि प्रक्रिया करून विक्री करणारे कुलदीप खोत यांच्या प्रकल्पास, भेट देऊन छोट्याश्या खेड्यात केलेल्या औषधी वनस्पती प्रक्रिया उद्योगाचे कौतुक केले. प्रकल्पावरील स्पिरुलिना शेवाळ शेती, मधमाशी पालन, औषधी वनस्पतींची प्रक्रिया, यांची पाहणी करून, “रत्नप्रकाश आयुर्वेद” या आउटलेटला भेट देऊन, पक्क्या उत्पादनांची माहिती घेऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी, शास्त्रज्ञ डॉक्टर हेमराज यादव, आंतरराष्ट्रीय फॅशन डिझायनर अश्विनी यादव, त्यांचे भाचे कृष्णात खोत (मा. सरपंच), साताप्पा खोत, सौ. दिपाली खोत इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## लग्नघरी धाडसी चोरी; 50 लाखांचा ऐवज लंपास लग्नघरी कोणीही नसल्याची संधी साधून चोरट्यांनी केला हात साफ

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई/परवेज पटेल**
अंबाजोगाई शहरालगत असलेल्या शेपवाडीत शनिवारी (दि.२०) रात्री चोरट्यांनी लाघरी कोणी नसल्याची संधी साधून रोख रकम आणि सोने असा ५० लाखापेक्षाही अधिक किमतीचा ऐवज लंपास केला या घटनेने खळबळ उडाली आहे. ङ्गङ्गयाबाबत समजलेली अधिक माहिती अशी की, शेपवाडी येथील विष्णुपंत शेप यांच्या घरातील लग्नसोहळा दोन दिवसांवर आला आहे. बासाठी त्यांनी रोख रकम आणि सोन्याचे दागिने घरामध्ये आणून ठेवली होती शनिवारी सायंकाळी



घरातील सर्व सदस्य दुसऱ्या एका लग्न समारंभासाठी गेले होते त्यामुळे घरात कोणीच नसल्याची संधी साधून चोरटे घरात घुसले आणि ३३ लाख रुपये रोख व २५ तोळे सोन्याचे दागिने असा ५० एकूण लाखांपेक्षाही अधिक रकमेचा ऐवज लंपास केला शेप कुटुंबीय लग्नाहून परतल्यावर त्यांना चोरी झाल्याचे लक्षात आले घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी तातडीने पोहोचून पंचनामा केल धान आणि ठसे तज्ञ पथकाला पाचारण केले घटनेचा पोलीस तपास करीत आहेत

# राष्ट्राच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकत्रित येऊन कार्य करणे काळाची गरज डॉ.उदय निरगुडकर



**वादळवार्ता/शिरूर कासार**
आज लहानांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वच माणसं 4g 5g च्या जमान्यात दिवसभर व्यस्त दिसत असून आपण नेमके चालत कुणीकडे याचे जराही भान राहिले नसून लाईक आणि कमिटमेंट करण्यात धन्यता मानत दिवस घालवत आहोत हे कुठेतरी थांबवून राष्ट्राच्या प्रगतीसाठी सर्वसामान्यांनी मतभेद विसरून एकत्रित येऊन सर्वच क्षेत्रातील कार्य करणे काळाची गरज असल्याची मत Z 24 तास चे माजी संपादक डॉ.उदय निरगुडकर यांनी खालापुरी तालुका शिरूर कासार या ठिकाणी विकसित ग्राम ते विकसित भारत या ग्रामसंवाद कार्यक्रमात बोलताना केले. शिरूर कासार तालुका आदर्श पत्रकार संघ व ग्रामस्थांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवी अनंत कराड ही होते तर प्रमुख पाहुणे म्हणून Z 24 तास चे माजी संपादक डॉ. उदय निरगुडकर हे होते. संपादक जगन्नाथ परजने, पत्रकार सतीश मुरकुटे अंगद पानसंबळ ,युवराज बर्डे, शिवाजी वाघमारे यांची उपस्थिती होती . पुढे बोलताना निरगुडकर म्हणाले की पूर्वी बोललं जायचं की, तिसरं महायुद्ध ही पाण्यासाठी होईल ते आता खरं वाटु लागला असून आज राज्यात तर आहेच परंतु देशात तसेच जगातही भयानक पाणी प्रश्न निर्माण झाला आहे त्यामुळे आपल्याला आता त्याला प्रखरपणे समोर जावेच लागणार आहे त्यामुळे सर्वांनी एकत्र येऊन मतभेद विसरून काम करावे लागणार आहे सर्वांनी प्रेरित होऊन काम केले तर त्यावर मात करु व प्रगतशील राष्ट्र बनवु . नकारात्मक, व्यस्त, सुस्त माणसांपासून सावध राहून आपल्याला आता काम पुढे न्यावे लागणार आहे संकट तर इतर देशांनाही आली होती त्यांनी धैर्याने सामना करून त्यावर मात केली असेच काम आता आपणाला दुष्काळावर मात करून एकत्र येऊन काम करावे लागणार आहे एकत्र येऊन काम केले तर इतिहास घडत असतो. त्यामुळे शिरपूर सारखे पॅटर्न गावागावात राबवली गरजेचे असल्याचे मतही त्यांनी व्यक्त करून जलस्रोत वाढवण्यासाठी ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर काम करणे गरजेचे आहे त्यासाठी नाम फाउंडेशन यांच्या माध्यमातून मी आपल्याला सहकार्य करीन असेही त्यांनी सांगितले . फोरजी फाईव्ह जी च्या जमानात व्यस्त न राहता विकसित भारत घडवण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी म्हटले यावेळी मोठ्या प्रमाणावर ग्रामस्थांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनू डिजिटल छापनू संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथनू त्यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )